**विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अहिल्यानगर येथे प्रशिक्षणार्थी करीता चहा, नाष्टा व जेवण पुरवठा करणेसाठी उत्पादक, अधिकृत विक्रेता पुरवठादार यांचे कडुन दरपत्रके मागविणेत येत आहे.**

जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेमार्फत
जिल्हा प्रशिक्षण केंद्र,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

कामाचे नांव :- सन २०२६ -२७ करीता प्रशिक्षणार्थींना **करीता प्रशिक्षणार्थींना जेवण,चहा व नाष्टा** पुरवठा करणेसाठी दि.१३/०३/२०२६ पासुन पुढील आठ दिवसांच्या आत दरपत्रके वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अहिल्यानगर यांचे नावे जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अहिल्यानगर येथे खालील अटि व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रकाची नोटीस जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे **https://nagarzp.gov.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

## दरपत्रके सादर करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

**दरपत्रके दोन लिफाफे पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. सदर लिफाप्यामध्ये खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

**लिफाफा क्रमांक १ :- तांत्रिक लिफाप-यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे.**

१) फर्मच्या/प्रो.पा. यांचे नावाचे पॅनकार्ड व आधारकार्ड
२) संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आवश्यक.
३) GST नोंदणी प्रमाणपत्र
४) समान दर आल्यास अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.
५) अन्न व औषध प्रशासनाचे प्रमाणपत्र.
६) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट).
७) बंधपत्र

**लिफाफा क्र.२ :- चहा,नाष्टा व जेवण दरपत्रक वर्णन.**

## अटी व शर्ती :-

१) पुरवठा आदेश मिळाल्यापासुन दिलेल्या मुदतीत साहित्य स्वखर्चाने कार्यालय सांगेल तसे व तिथे पोहोच करावे लागेल.
२) निविदा धारकाने सादर केलेले दर हे पुरवठा आदेश दिनांकापासुन १ वर्षापर्यंत स्विकृतीस पात्र ठरतील.
३) अंदाजीत दर्शविलेल्या अन्नपुरवठा खरेदी कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे.
४) दरपत्रक धारकाने पदार्थाचे दर सर्व करासह नमुद करावे, तसेच सर्व पदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.
५) चहा, नाष्टा व जेवण खरेदी करणेंबाबतचा दर लिफाफा क्र.२ मध्ये भरण्यात यावे.
६) निविदा कराराबाबतच्या सर्व सुचना व अटी काळजीपुर्वक वाचाव्यात आणि त्याप्रमाणेच दरपत्रक भरावेत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार मान्य करण्यात येणार नाही.

७) दरपत्रक उघडतेवेळी प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. यामध्ये दरपत्रक अटी व शर्तीप्रमाणे सर्व कागदपत्रे या कार्यालयाच्या मागणीप्रमाणे अद्यावत असलेबाबतची खात्री करुन घेतल्यानंतर लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल लिफाफा क्र.१ मध्ये काही कागदपत्रे अपुर्ण अथवा कमी आढळुन आल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही स्पर्धकाचे दरपत्रक रद्द केले जाईल सर्व कागपदत्र पुर्ण असल्यानंतरच दराचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

८) दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा शिथिल करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

९) दरपत्रक स्विकारल्या नंतर भोजनालय सुरु करण्याचे कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्यावर त्वरीत उपहारगृह सुरु करावे लागेल.

१०) उपहारगृह सुरु झाल्यावर काही तांत्रिक बाबी किंवा जेवणविषयी तक्रारी प्राप्त झाल्यास उपहारगृह बंद करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

११) या कार्यालयात येणारे अधिकारी/कर्मचारी यांना प्रथम प्राधान्य राहील. आरोग्य विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी यांना उपहारगृहात भोजन करण्याची परवानगी राहील परंतु बाहेरील व्यक्तींना परवानगी राहणार नाही.

१२) प्रत्येक प्रमाणपत्रावर निविदा धारकाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

१३) उपहारगृहात कोणत्याही व्यक्तीला राहता येणार नाही. (प्रशिक्षणार्थींना रात्रीचे जेवण झाल्यावर रात्री १०.३० वाजता उपहारगृह बंद करावे.

१४) उपहारगृहात मद्यपान व धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील. तसे गैरवर्तन आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१५) प्रशिक्षणार्थी सत्रात सकाळी/ रात्री प्रत्यक्ष भोजन घेतील त्यानुसार देयक अदा केले जातील.

१६) उपहागरृहात काम करणा-या कामगार वर्गाचे पोशाख एकसमान,निटनेटके तथा स्वच्छ असणे बंधनकारक राहील. १८ वर्षावरील कामगारांनाच कामासाठी नियुक्त करावे.

१७) उपहारगृहात नेमण्यात आलेला कामगार वर्गाची नावांची यादी,पत्ता,आधारकार्ड, किमान वेतन आणि फोटो इ. अभिलेख कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. कोणत्याही कर्मचा-यास कामावरुन कमी केल्यास नविन कर्मचारी नेमल्यास कार्यालयास सुचित करावे.

१८) दरपत्रक प्रक्रिये मध्ये दिलेले जेवणाचे मेनु नुसारच जेवण पुरविण्यात यावे यांची नोंद घेण्यात यावी. शिळे जेवण पुरविल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर जेवणाचे बिल अदा करण्यात येणार नाही.

१९) उपहारगृहात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी आहार पुरवठादाराची राहील व उपहारगृह उत्कृष्ठ स्वच्छता राखणे बंधनकारक राहील.

२०) प्रशिक्षणार्थींना भोजन वाढवण्यासाठी पुरवठादाराने आपले कर्मचारी नेमण्यात यावे. तसेच खाद्य पदार्थाच्या वितरणासाठी लागणारे फर्निचर कार्यालयाकडुन पुरविण्यात येईल. परंतु स्वयंपाकासाठी लागणारे साहीत्य, गॅस,इतर भांडी उपकरणे इ. या कार्यालयाकडुन पुरविण्यात येणार नाही.

२१) पाण्याचा वापर निव्वळ भांडी धुणे, भाजीपाला धुणे, स्वयंपाक करणे स्वयंपाकगृह/ उपहारगृहाची स्वच्छता या साठीच करता येईल. इतर बाबीसाठी पाण्याचा वापर करता येणार नाही.

२२) विजेचा वापर लाईट, पंखे, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, किचन मधील मिक्सर इ.साठी करता येईल. याशिवाय विजेवर चालणारी इतर उपकरणे वापरता येणार नाहीत

२३) **स्वयंपाकासाठी/ भोजन वाढणेसाठी नेमलेले कर्मचारी निरोगी असावेत**. सदर कर्मचाऱ्यांची तीमाही वैद्यकीय तपासणी करुन तसे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. तसे न-केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात यावा व पुरेसे कर्मचारी ठेवावेत.

२४) जेवणाचा/ नाष्टयाचा साप्ताहिक मेनुकार्ड उपहारगृहाच्या दर्शनी भागात लावावा.त्यानुसारच जेवन देण्यात यावे.

२५) नाष्टयाचा दररोजचा मेनु ठरल्याप्रमाणेच नाष्टा प्रशिक्षणार्थींना दिला जाईल यांची दक्षता घ्यावी तसे न झाल्यास त्या दिवसांचा नास्ताचे व जेवणाचे बील अदा केले जाणार नाही.

२६) दररोज सकाळी नास्ता मध्ये पोहे, उपमा, शिरा, वडा सांबर, इडली सांबर, उसळ, उसळपाव इ. नास्ता हा चवदार असावा. यापैकी एक मेनु दिला जावा दररोज सारखाच मेनु दिल्यास नास्ता दिला गेला नाही असे समजण्यात येईल.

२७) नास्ता/ जेवण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीचे सकाळ संध्याकाळची हजेरी उपहारगृहात ठेवावी ज्यांनी नास्ता/ जेवण घेतले त्यांचेच बील अदा करण्यात येईल व तसेच बीलावर संबधीत सत्र समन्वयका कडुन प्रमाणीत करुन घ्यावे.

२८) स्थानिक प्रशिक्षणार्थी रात्री वसतीगृहात राहत नाहित प्रशिक्षण सत्र संपल्यानंतर घरी निघुन जातात अशा प्रशिक्षणार्थीचे रात्रीचे भोजनाचे बील अदा केले जाणार नाही.

२९) अन्नविषबाधा होऊन शारिरीक/ जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेचा ठेकेदारांची राहील.

३०) स्वयंपाकगृह/ उपहारगृहाचे नुकसान/ मोडतोड, पुरविलेले फर्निचर, साहीत्य इ.हरविणे/ मोडतोड/ नुकसान इ. उपहारगृह ठेकेदाराकडुन वसुलपात्र राहील व प्रचलित नियमांचे आधारे ते वसुल करण्यात येईल.

३१) उपहारगृहातील कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी/कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी / प्रशिक्षक यांचेशी आदराने वागणे अपेक्षित आहे. वागणुकीबाबत प्रशिक्षणार्थी/ प्रशिक्षक यांची तक्रार प्राप्त झाल्यास सदरील कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

३२) खाद्य पदार्थाचा दर्जा समाधानकारक नसल्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना राहील.

३३) काही कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे तुम्हाला शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देऊन करार संपुष्टात करण्यात येईल.

३४) प्रशिक्षणार्थींनी फिडबॅक फॉर्म मध्ये जेवणाच्या बाबतील ५ पैकी सरासरी ३ पेक्षा कमी गुण मिळाल्यास त्या प्रशिक्षण सत्राच्या जेवणाच्या देयकातुन २० टक्के रक्कम कपात करण्यात येईल. तसेच तीन प्रशिक्षण सत्राच्या फिडबॅक फॉर्म मध्ये ३ पेक्षा कमी गुण मिळाल्यास ठेका रद्द करण्यात येईल. व पुढील न्युनतम निविदा धारकास **एल१** दरावर(न्यूनतम दरावर)ठेका देण्यात येईल.

३५) प्रशिक्षणार्थीचे जेवणाचे देयके प्रशिक्षण संपल्यानंतर ७ दिवसातच्या आत दयावे. देयक अदा करताना नियमानुसार आयकर व जी.एस.टी.कपात करण्यात येईल. देयक सादर करतांना वस्तू व सेवा कर (जी.एस.टी) लावुनच देयक सादर करावे. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येतील.

३६) **उपहारगृहाच्या ड्रेनेज लाईन मध्ये कचरा टाकू नये.ओला कचरा व कोरडा कचरा स्वतंत्र ठेवण्यात यावे व कचऱ्याची विल्हेवाट आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.** कचऱ्याची विल्हेवाट करण्याकामी लागणारे साहित्य (पिशवी व इतर) आपल्या स्तरावरुन पुरवठा करण्यात यावा.

३७) निविदा सुचना व निविदा धारकांना पुरविण्यात आलेल्या सर्वसाधारण सुचनांमध्ये नमुद केलेले नियम निविदाधारकांना बंधनकारक राहील.

३८) **सर्वात कमी किमंतीची निविदा स्विकारण्यास कार्यालय बांधील नाही.**

३९) अ) सकाळचा चहा :- सकाळी ९.०० ते १०.३०

ब) सकाळचा नास्ता :- सकाळी ९.०० ते १०.३०

ब) दुपारचे जेवण :- दुपारी १.०० ते ३.००

क) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.००

ड) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ९.३०

४०) लिफाफा क.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणेच व दिलेल्या आदेशा प्रमाणे सर्व पदार्थ दुपारच्या व रात्रीच्या जेवणात देणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली निविदा रद्द करण्यात येईल.

४१) निविदा स्विकारल्यानंतर चहा, जेवण, व नाष्टा सुरु करण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन मागणी नुसार जिल्हा प्रशिक्षण केंद्र, येथे ठरलेल्या दराप्रमाणेच स्वखर्चाने पुरवठा करावा लागेल अन्यथा आपले टेंडर रद्द करण्यात येईल.

४२) कोणतेही कारण न दाखविता निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा हक्क या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

४३) निविदांमध्ये दिलेले पदार्थाखेरीज इतर कोणतेही पदार्थ ठेवता येणार नाही.

४४) चहा,नाष्टा व जेवण ट्रेनिंगच्या ठिकाणी मागणी प्रमाणे जागेवर मंजुर दराप्रमाणे स्वखर्चाने पोहोच करावे लागेल.

४५) पुरवठा केलेल्या अन्नपदार्थाची मंजुर कलेल्या दराप्रमाणे देयक सादर करावयाचे आहे.या निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचे वाद झाल्यास मा.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा निर्णय अंतिम राहील.

४६) पुरवठा आदेश देण्यापूर्वी लिफाफा क्रमांक-१ मुळ तांत्रिक कागदपत्रामध्ये तफावत आढळल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना राहील यांची नोंद घ्यावे.

४७) पुरवठा आदेश दिल्यानंतर ८ दिवसाच्या आत वरील अटी मान्य असल्याबाबत रुपये १०० च्या रेव्हेन्यु स्टॅम्पवर लिहून देणे बंधनकारक राहील.

४८) पुरवठाधारकास तपासणीकरीता दररोज एक संपुर्ण जेवणाचे ताट अधिकारी /कर्मचारी यांना विनामुल्य देण्यात यावे.

# लिफाफा क्रमांकः-०२ (निविदा)

(अ) निविदा धारकाचे नांव व

संपुर्ण पत्ता ________________________________________

________________________________________

## २) कामाची मुदतः- एक वर्ष

**दर :- २ वेळेस चहा, १ वेळी नाष्टा व २ वेळेस जेवण (अमर्यादित) याकरीता रक्कम रुपये २००/- प्रति व्यक्ती/प्रति दिन या प्रमाणे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त असते.**

### दैनंदिन आहारसेवा (शुध्द शाकाहारी जेवण)

| अ.क्र. | बाब | पदार्थाचे नाव | जीएसटी सह दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १ | पेय | चहा (१ कप) | |
| २ | | ब्लॅक टि (१ कप) | |
| ३ | | कॉफी (१ कप) | |
| ४ | | चहा बिना साखर (१ कप) | |
| ५ | | दुध (१ कप) | |
| ६ | | दुध (१ ग्लास ,२५० मिली.) | |
| २ | नाष्टा | नाष्टा २०० ग्रॅम (१ प्लेट)<br>१) पोहे - (१ प्लेट)<br>२) उपमा - (१ प्लेट)<br>३) मेदुवडा सांबार - २ नग व सांबर<br>४) पराठा - २ नग व चटणी<br>५) बटाटे वडा - २ नग व २ पाव<br>६) इडली चटणी सांबार - ३ इडली व १ वाटी चटणी/सांबार<br>७) पावभाजी - १ प्लेट २ पाव<br>८) समोसा - २ नग<br>९) मिसळ- पाव - २ नग | |
| ३ | दुपारचे जेवण शाकाहारी अमर्यादित | दोन भाज्या,(एक पातळ व एक सुकी भाजी),गव्हाच्या पोळया/भाकरी,वरण,भात,पापड,लोणचे,कांदा,लिंबु, कोशबींर आणि चटणी (फुल जेवनात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील) | |
| ४ | रात्रीचे जेवण | एक भाजी,चपाती/भाकरी, पुलाव/खिचडी किंवा भात/वरण ,लोणचं, आणि चटणी | |
| ५ | स्विट | शिरा (१ वाटी), गुलाबजामुन (२ नग), जिलेबी (२ नग), मोतीचुर लाडु (१ नग), खीर (१ वाटी) | |
| | | (अ)एकुण रक्कम | |

दर :- २ वेळेस चहा, १ वेळी नाष्टा व २ वेळेस जेवण (अमर्यादित) याकरीता रक्कम रुपये २५०/- या प्रमाणे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त असते.

## दैनंदिन आहारसेवा (मांसाहारी जेवण)

| अ.क्र. | बाब | पदार्थाचे नाव | जीएसटी सह दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १ | पेय | चहा (१ कप) | |
| २ | | ब्लॅक टि (१ कप) | |
| ३ | | कॉफी (१ कप) | |
| ४ | | चहा बिना साखर (१ कप) | |
| ५ | | दुध (१ कप) | |
| ६ | | दुध (१ ग्लास ,२५० मिली.) | |
| २ | नाष्टा | नाष्टा २०० ग्रॅम (१ प्लेट)<br>१) पोहे - (१ प्लेट)<br>२) उपमा - (१ प्लेट)<br>३) मेदुवडा सांबार - २ नग व सांबर<br>४) पराठा - २ नग व चटणी<br>५) बटाटे वडा - १ नग व पाव २<br>६) इडली चटणी सांबार - ३ इडली व १ वाटी चटणी/सांबार<br>७) पावभाजी - १ प्लेट २ पाव<br>८) समोसा - २ नग<br>९) मिसळ- पाव - २ नग<br>१०) ऑम्लेट - पाव-२ नग<br>११) बाईल अंडी २ नग | |
| ३ | दुपारचे जेवण मांसाहारी अमर्यादित | चिकन रस्सा भाजी ( कमीत कमी ५ पिस व रस्सा अमर्यादित), अंडा करी, गव्हाच्या पोळया/ भाकरी ,भात, कांदा आणि लिंबु. | |
| ४ | रात्रीचे जेवण | चपाती/भाकरी,पुलाव/खिचडी किंवा भात/वरण, एक भाजी, लोणचं आणि चटणी | |
| | | (अ)एकुण रक्कम | |

## दैनंदिन आहारसेवा (उपवासाचे जेवण)

| अ.क्र. | बाब | पदार्थाचे नाव | जीएसटी सह दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १ | पेय | चहा (१ कप) | |
| २ | | ब्लॅक टि (१ कप) | |
| ३ | | कॉफी (१ कप) | |
| ४ | | चहा बिना साखर (१ कप) | |
| ५ | | दुध (१ कप) | |
| ६ | | दुध (१ ग्लास ,२५० मिली.) | |
| | | | |

| अ.क्र. | बाब | पदार्थाचे नाव | जीएसटी सह दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| २ | नाष्टा | नाष्टा २०० ग्रॅम (१ प्लेट)<br>१) साबुदाना वडा -२ नग ,१ वाटी दही | |
| ३ | दुपारचे जेवण अमर्यादित | साबुदाना खिचडी (अमर्यादित) ,२ फळे , दहि/उपवासाची आमटी (१ वाटी) | |
| ४ | रात्रीचे जेवण | साबुदाना खिचडी (अमर्यादित) , दहि/उपवासाची आमटी (१ वाटी) | |
| | | **(अ)एकुण रक्कम** | |

नविदा धारकाची सही नांव व
शिक्का

स्वाक्षरीत×××
(डॉ.जयश्री शिंदे)
**वैद्यकिय अधिकारी**
**जिल्हा प्रशिक्षण केंद्र**
**अहिल्यानगर**

स्वाक्षरीत×××
( डॉ.बापुसाहेब नागरगोजे)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

# बंधपत्र

मी/आम्ही गांर्भीयपुर्वक नमुद करीतो की, मी/आम्ही वर नमुद केलेल्या अन्नपदार्थ पुरवठा

कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदेसोबत असलेल्या दरपत्रकामध्ये नमुद करीत आहे/आहोत. जर माझी/आमची निविदा स्विकृत करण्यात आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधील राहु. या अटि व शर्तीचा भंग मी /आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनिय कार्यवाहीस पात्र राहील. मी /आम्ही निविदेत दिलेल्या अन्नपदार्थाचा पुरवठा दरपत्रकामधील तपशिलानुसार सर्व अटी करीता बांधील राहील. वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

निविदा संपुर्णपणे मान्य करणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे तसेच अंशतः मान्य करणे अथवा संपुर्णतः नाकरण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी राखुन ठेवलेला आहे. या बाबत माझी काहीही हरकत नाही.

स्थळ :-
दिनांक :-

**निविदा धारकाची सही व शिक्का**

**नांवः-** ____________________

**पत्ताः-** ____________________